पुढारी MY कोल्हापूर गुरुवार, २ ऑक्टोबर २०२५

# टेबल टेनिस स्पर्धेत विवेकानंद महाविद्यालय प्रथम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ व डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, साळोखेनगर यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या शिवाजी विद्यापीठअंतर्गत महिला व पुरुष टेबल टेनिस स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालयाचा टेबल टेनिस पुरुष संघ अंतिम सामन्यात केआयटी कॉलेज ऑफ इंजीनिअरिंगवर मात करून प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला. संघाची इंटरझोनल टेबल टेनिस स्पर्धेकरिता निवड झाली. या खेळाडूंना प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. श्रुती जोशी, जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, रजिस्ट्रार एस. के. धनवडे, सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी कोल्हापूर, गुरुवार, २ ऑक्टोबर २०२५

# विवेकानंद, दत्ताबाळ, पद्माराजे संघ विजेते

**मनपास्तर शालेय हॉकी स्पर्धा**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विवेकानंद कॉलेज, दत्ताबाळ मिशन स्कूल आणि पद्माराजे हायस्कूल संघांनी आपआपल्या प्रतिस्पर्ध्यांचा पराभव करून मनपास्तर शालेय हॉकी स्पर्धेत विजेतेपद पटकाविले. महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळ व जिल्हा क्रीडा कार्यालय आयोजित ही स्पर्धा मनपाच्या मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियमवर सुरू आहे.

स्पर्धेच्या मुलांच्या १७ वयोगटात विवेकानंद कॉलेजने विमला गोएंका संघाचा २-० असा पराभव केला. विवेकानंदकडून पीयूष करडे व सार्थक राणे यांनी विजयी गोल केले. विवेकानंदच्या संघात अंकुश महेंद्रकर, हर्षवर्धन पाटील, सार्थक राणे, श्रीतेज कोगेकर, शिवराज दिवे, वीर पाटील, मुजमिलखान बाबाखान, मयंक नलगे, पीयूष करडे, पार्थ तोडकर, गुरुराज टिपुगडे, गणेश लोखंडे, आराध्य जाधव, आयुष हवळ, हर्षवर्धन सुतार यांचा समावेश आहे. संघाला प्रशिक्षक संतोष कुंडले, साद मुजावर यांचे मार्गदर्शन लाभले.

१७ वयोगट मुलींत दत्ताबाळ इंग्लिश मीडियम स्कूलने महावीर इंग्लिश स्कूल २-१ असा पराभव केला. दत्ताबाळकडून अनन्या माहिडक व तनिष्का संकपाळ, तर महावीरकडून आचल तेलवीने गोल केला. दत्ताबाळ स्कूलच्या संघात अनन्या महाडिक, समायरा शेख, रिधीशा पाटील, सलोनी गायकवाड, श्रेयसी चौगुले, प्रिन्सी कांबळे, परिनीता चराटे, तनिष्का संकपाळ, जान्हवी कालेकर, ईश्वरी सूर्यवंशी, आराध्या चव्हाण, अभिलाषा गाडवे, मनस्वी जोसेफ यांचा समावेश आहे. सर्वांना प्रशिक्षक समीर भोसले यांचे मार्गदर्शन लाभले.

१९ वयोगटातील मुलींच्या अंतिम सामन्यात पद्माराजे गर्ल्स हायस्कूलने छत्रपती शाहू महाराज हायस्कूल व ज्यू कॉलेजचा २-० असा पराभव केला. परिणीता चव्हाण व इरा जाधवने प्रत्येकी एक गोल केला. विजयी संघात प्रसिद्धी कांबळे, सृष्टी पारगावकर, श्रेया खराडे, राजनंदिनी टिटवेकर, परिणिता चव्हाण, दीक्षा बिल्ले, दिया मोहिते, तनिष्का जाधव, गायत्री गोसावी, केतकी चव्हाण, कार्तिकी शिंदे, ऋत्वि सांगळे, इरा जाधव, अर्पिता लोंढे, मधुरा भोसले, स्वरूपा पोवार यांचा समावेश आहे. सर्वांना प्रशिक्षक महेश सूर्यवंशी, श्वेता पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.



कोल्हापूर : मनपास्तर हॉकी स्पर्धेत १७ व १९ वयोगटात विजेतेपद पटकाविणारे विवेकानंद कॉलेज, दत्ताबाळ मिशन स्कूल आणि पद्माराजे हायस्कूलचे संघ. सोबत मान्यवर, प्रशिक्षक, मार्गदर्शक व संयोजक.

पुण्यनगरी | गुरूवार,२ ऑक्टोबर २०२५ | कोल्हापूर

# 'विवेकानंद'च्या विद्यार्थ्यांची 'गोकुळ'प्रकल्पास भेट

कोल्हापूर : येथील विवेकानंद कॉलेजच्या बी. कॉम. भाग-३ च्या ३५ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी व शिक्षकांनी कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या गोकुळ दूध प्रकल्पास औद्योगिक भेट दिली. यावेळी गोकुळ दूध संघाच्या सचिन लोहार व आशुतोष महेकर या अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना दूध प्रकल्पातील संपूर्ण प्रक्रियेची आणि दुग्धजन्य पदार्थांची निर्मिती कशी केली जाते. याबद्दल माहिती दिली. यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडली. या भेटीचे नियोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली वाणिज्य विभागप्रमुख प्रा. सनी काळे यांनी केले होते. यावेळी विद्यार्थ्यांसमवेत डॉ. अमोल मोहिते, प्रा. ओंकार कुलकर्णी उपस्थित होते.

पुण्य नगरी
गुरुवार, २ ऑक्टोबर २०२५

# 'विवेकानंद'चा टेबल टेनिस संघ विजेता

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ व डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, साळोखेनगर यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत झोनल महिला व पुरुष टेबल टेनिस स्पर्धेत विवेकानंद महाविद्यालयाचा पुरुष टेबल टेनिस संघ विजेता ठरला. अंतिम सामन्यात या संघाने केआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगवर मात केली. या यशामुळे संघाची शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर येथे होणाऱ्या इंटरझोनल टेबल टेनिस स्पर्धेसाठी निवड झाली आहे. महाविद्यालयाच्या विजयी संघातील अनिष सोनटक्के, भव्य शाह (बी.कॉम. ३), आदर्श पाटील (बी.ए. २), ऋषीकेश नलवडे (एम.कॉम. १), समर्थ चव्हाण (बी.एस.सी.सी.एस. २) या यशस्वी खेळाडूंना कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे यांनी अभिनंदन करून प्रोत्साहन दिले.

तरुण भारत संवाद
गुरुवार,
२ ऑक्टोबर २०२५

# विवेकानंदमध्ये 'गरबा-दांडियां'वर थिरकली तरुणाई



**प्रतिनिधी**
कोल्हापूर

विवेकानंद कॉलेज,कोल्हापूर मधील संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे स्त्री अभ्यास केंद्र, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, सचेतना मंडळ आणि सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने नवरंगी नवरात्री उत्सवानिमित गरबा-दांडिया नृत्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

या स्पर्धांमध्ये महाविद्यालयातील ज्युनिअर व सिनिअर कॉलेज गटातील एकूण १३ संघानी सहभाग नोंदवून बहारदार नृत्य सादरीकरण केले. या स्पर्धा श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवनमध्ये झाल्या. यावेळी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या समन्वयक डॉ.श्रुती जोशी, डॉ.कविता तिवडे, डॉ. सिध्दार्थ कट्टीमनी, प्रा.सनी काळे, प्रा पल्लवी देसाई, डॉ.राजश्री पाटील, प्रा गीतांजली साळुंखे, प्रा. सौ एस पी वेदांते यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या उदघाटनप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ आर आर कुंभार म्हणाले की, शारदीय नवरात्र उत्सवानिमित गरबा व रास दांडिया स्पर्धांचे आयोजन म्हणजे स्त्री शक्तीचा सन्मान आणि आदर होय.

सदर स्पर्धेमध्ये सिनिअर कॉलेज गटात प्रथम क्रमांक सांस्कृतिक विभाग विद्यार्थी ग्रूप, व्दितीय क्रमांक नीलम पुरोहित आणि ग्रूप व तृतीय क्रमांक वृषाली पाटील आणि ग्रूप यांनी मिळविला. तर ज्युनिअर कॉलेज गटात प्रथम क्रमांक बीट बेकर्स ग्रूप, व्दितीय क्रमांक गुज्जु गाईज व ग्रूप व तृतीय क्रमांक देसी गर्ल्स ग्रूप यांनी मिळविला. विजेत्या स्पर्धकांना रोख बक्षिस रक्कम देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून स्टीवन पौलस व नेहा भस्मे यांनी काम पाहिले.

प्रास्ताविक स्त्री अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. संपदा टिपकुर्ले यांनी केले. स्वागत प्रा.सौ शिल्पा भोसले यांनी केले. आभार डॉ ए.एस.महात यांनी मानले. सुत्रसंचालन डॉ. सुप्रिया पाटील यांनी केले. या, प्रसंगी ज्युनिअर व सिनिअर कॉलेजच्या शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

तरुण भारत संवाद

गुरुवार, २ ऑक्टोबर २०२५



१७ वर्षाखालील मुलांचा विजयी संघ



१७ वर्षाखलील मुलींचा विजयी संघ.

# मुलांमध्ये विवेकांनद, मुलींमध्ये पद्माराजे विजयी

## मनपास्तर हॉकी स्पर्धा

प्रतिनिधी

कोल्हापूर

कोल्हापूर महानगरपालिका प्राथमिक शिक्षण समिती व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आयोजित मनपास्तर शालेय हॉकी स्पर्धेत १७ वर्षाखालील मुलांमध्ये विवेकानंद कॉलेज, मुलींमध्ये दत्ताबाळ इंग्लिश मीडियम स्कूल तर १९ वर्षे मुलींमध्ये पद्माराजे गर्ल्स हायस्कूलने जेतेपद पटकावले. या स्पर्धा मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम येथे झाल्या.

### १७ मुले अंतिम निकाल

विवेकानंद कॉलेजने विमला गोएंकाचा २–० ने पराभव केला. विवेकानंदकडून पियुष करडे व सार्थक राणे एक गोल केली.

विजयी संघात अंकुश महेंद्रकर, हर्षवर्धन पाटील, सार्थक राणे, श्रीतेज कोगेकर, शिवराज दिवे, वीर पाटील, मुजमिलखान बाबाखान मयंक नलगे, पीयूष करडे, पार्थ तोडकर, गुरुराज टिपुगडे, गणेश लोखंडे, आराध्य जाधव,आयुष हवळ हर्षवर्धन सुतार या मुलाचा समावेश विजयी संघाला प्रशिक्षक संतोष कुंडले, साद मुजावर यांचे मार्गदर्शन लाभले.

### १७ वर्ष मुली अंतिम सामना :

दत्ताबाळ इंग्लिश मीडियम स्कूलने महावीर इंग्लिश स्कूल २–१ गोलने पराभव केला. दत्ताबाळकडून अनन्या महाडिक, तनिष्काने तर महावीरकडून आचल तेलवीने गोल केला.

विजयी संघात अनन्या महाडिक, समायरा शेख, रिधीशा पाटील, सलोनी गायकवाड, श्रेयसी चौगुले, प्रिन्सी कांबळे, परिनीता चराटे, तनिष्का संकपाळ, जान्हवी कालेकर, ईश्वरी सूर्यवंशी, आराध्या चव्हाण, अभिलाषा गाडवे, मनस्वी जोसेफ. या मुलींचा समावेश होता. विजयी संघाला प्रशिक्षक समीर भोसले यांचे मार्गदर्शन लाभले.

### १९ वर्षे मुली अंतिम सामना

पद्माराजे गर्ल्स हायस्कूलने छत्रपती शाहू महाराज हायस्कूल अँड ज्यू कॉलेजचा २–० गोलने पराभव केला. पद्माराजेकडून परिणीता चव्हाण, इरा जाधवने १ गोल केला. विजयी संघात प्रसिद्धी कांबळे, सृष्टी पारगावकर, श्रेया खराडे, राजनंदिनी टिटवेकर, परिणिता चव्हाण, दीक्षा बिल्ले, दिया मोहिते, तनिष्का जाधव, गायत्री गोसावी, केतकी चव्हाण, कार्तिकी शिंदे, ऋत्वि सांगळे, इरा जाधव, अर्पिता लोंढे, मधुरा भोसले. स्वरूपा पोवार प्रशिक्षक महेश सूर्यवंशी, श्वेता पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.